महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर

जुना पुणे - बेंगलोर रोड, शिवाजी विद्यापीठ जवळ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (महाराष्ट्र)
ईमेल : store.gcoekolhapur@dtemaharashtra.gov.in
वेबसाईटः www. gcoekolhapur.ac.in ☎ : ०२३१-२५२१०३८

AICTE Permanent ID: 1-43363660274 DTE Code: 6036 Establishment Year: 2023

जा. क्र. शाअमको/कवि-केंभा/सा.स्थ./२०२६-२७/ 930 दि. 07 AUG 2026

प्रति,

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

**विषय - संस्थेतील विविध विभागातील साहित्य संस्थेच्या नविन इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेकरीता दरपत्रक देणेबाबत.**

संदर्भ - दि. १६.०७.२०२६ रोजी मा. प्राचार्य यांच्या कक्षात झालेल्या बैठकीतील प्राचार्य यांच्या आदेशानूसार (प्राचार्य बैठकीचा इतिवृतांत जा.क्र.शाअमको/लले/विभाग प्रमुख/बै.इ./२०२६/२९ दि. २२/०७/२०२६)

महोदय,

या संस्थेतील खालील प्रमाणे नमूद विविध विभागातील साहित्य संस्थेच्या नविन इमारतीमध्ये स्थलांतरीत करावयाचे आहे. तरी आपले कमीत कमी दराचे दरपत्रक दि. १३/०८/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत देणेबाबत आपणांस कळविण्यात येत आहे. प्राप्त झालेली दरपत्रके दि. १४/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | दर रूपये |
|---|---|---|
| १ | कृत्रिम बुध्दीमत्ता व डेटा सायन्स विभागातील संगणक – ०६ नग, प्रोजेक्टर - ०१ नग इत्यादी | |
| २ | भौतिकशास्त्र विभागातील उपकरणे (साहित्य सामग्रीसह) - ७७ नग इत्यादी | |
| ३ | रसायनशास्त्र विभागातील उपकरणे (साहित्य सामग्रीसह) - ५७ नग, वॉटर कुलर – ०१ नग, काचसामान – ३०४ नग, टेबल – १२ नग, संगणक – १५ नग, प्रिंटर – ०१ नग, झेरॉक्स मशिन – ०१ नग, प्रोजेक्टर – ०२ नग इत्यादी | |
| ४ | संगणक विभागातील संगणक – ६४ नग, कपाट – ०२ नग, प्रोजेक्टर – ०२ नग, प्रिंटर – ०२ नग, वॉटर कुलर – ०१ नग, शैक्षणीक दस्ताऐवज इत्यादी | |
| ५ | विद्युत विभागातील संगणक – १९ नग, प्रिंटर – ०१ नग, प्रोजेक्टर – ०१ नग, स्टुल – १५ नग, प्रयोगशाळेतील किट – ५४ नग इत्यादी | |
| ६ | अणुविद्युत विभागातील प्रोजेक्टर – ०२ नग, संगणक – २८ नग, प्रिंटर – ०४ नग, स्टुल – १५ नग, प्रयोगशाळेतील किट – १४२ नग, मोठे कपाट - ०१ नग, लहान कपाट – ०१ नग, ए. सी. – ०२ नग, शैक्षणीक दस्ताऐवज इत्यादी | |
| ७ | यंत्र विभागातील – संगणक – २१ नग, प्रिंटर – ०१ नग, प्रोजेक्टर – ०१ नग, प्रयोगशाळेतील उपकरणे – ०९ नग, ड्रॉईंग बोर्ड – ६० नग, स्टुल – १५ नग, प्रयोगशाळेतील उपकरणांचा मोठा सेट – ०१ नग | |

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | दर रूपये |
|---|---|---|
| ८ | ग्रंथालय विभागातील लहान पुस्तके - १००० नग, मध्यम पुस्तके - २००० नग, मोठी पुस्तके – २५१६ नग, संगणक ०१ नग, रॅक – २० नग, टेबल – १० नग, कपाटे – २० नग इत्यादी | |
| ९ | कार्यालय विभागातील झेरॉक्स मशिन – ०१ नग, संगणक – १२ नग, प्रिंटर - ४ नग, लॅपटॉप – ०१ नग, बायो मेट्रीक मशिन – ०१ नग, ए. सी. – ०२ नग, स्कॅनर – ०२ नग, मोठे कपाट – ०३ नग, लहान कपाट – ०३ नग, नोटीस बोर्ड – ०१ नग, मोठया खुर्च्या – ३१ नग, लहान खुर्च्या – २२ नग, टेबल – ०६ नग, संगणक टेबल - १० नग, कार्यालयीन व शैक्षणीक दस्ताऐवज इत्यादी | |
| १० | जिमखाना विभागातील खेळाच्या साहित्याचा १ सेट, फोटो फ्रेम – ४५ नग, फलेक्स बॅनर – २२ नग | |
| | एकुण | |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे -

१. सदर स्थलांतरीत करावयाचे साहित्य दि. ०७/०८/२०२६ ते दि. १४/०८/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत त्या त्या विभागात प्रत्यक्ष जागेवर पाहण्यास मिळतील.
२. सदरचे साहित्य स्थलांतरीत करण्याचे दर सर्व करासहित देण्यात यावेत.
३. सदरचे साहित्य स्थलांतरीत करण्याचे दर प्रत्येक विभागनिहाय स्वतंत्र नमूद करावेत.
४. सदरचे साहित्य हे एकाच वेळी अथवा वेगवेगळया कालावधीत स्थलांतर करावे लागणार आहेत, याची सेवापुरवठादाराने नोंद घ्यावी.
५. सदर साहित्य स्थलांतरीत करणेकरीता आवश्यक सर्व साहित्य (पॅकिंग मटेरीयल, टुल्स, वाहन, मनुष्यबळ इत्यादी) हे सेवा पुरवठादाराने स्वत: आणणे आवश्यक आहे.
६. वहातूक, मजुरी, हमाली इत्यादी उपरोक्त दरामध्ये समाविष्ट करण्यात यावे.
७. सदर प्रकारचे काम यापूर्वी केले असल्यास त्याच्या आदेशाची छायांकित प्रत दरपत्रकासोबत जोडण्यात यावी.
८. सदर साहित्याचे दर हे दरपत्रक उघडण्यात आलेल्या दिनांकापासून सहा महिन्याकरीता वैध असावेत.
९. सदर साहित्याचे स्थलांतरीत करीत असताना नैसर्गिक आपत्ती, वादळ वारे, पाऊस व अन्य कारणाने साहित्याचे नुकसान झालेस त्याची सर्व जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. सदर साहित्याची नुकसान भरपाई चालू बाजार भावाने सेवा पुरवठादाराकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१०. सदर साहित्याच्या स्थलांतरात/जागेत आवश्यकतेनूसार बदल केले जाऊ शकतात.
११. दरपत्रकावर लागू असल्यास GST क्रमांकाचा उल्लेख करावा.
१२. दरपत्रके सिलबंद लिफाफयामधूनच पाठवावे. त्यावर वरीलप्रमाणे नमूद जावक क्र. दिनांक व विषय लिहावा.
१३. ई-मेल दवारे पाठविण्यात आलेले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही.
१४. प्राप्त दरपत्रकांची तुलना ही एकत्रित एकूण दरावर करण्यात येईल. त्यानूसार सेवा पुरवठादारांनी दर नमूद करावेत.
१५. एक किंवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षीकार यांनी राखून ठेवला आहे.
१६. सदर साहित्याचे दरपत्रक मंजुर झाल्यास आपणांस पुरवठा आदेश देण्यात येईल. त्याकरीता आपले राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर

प्रत - १. नोटीस बोर्डवर.
२. www.gcoekolhapur.ac.inया संकेतस्थळावर.